लातूर
# भूकंप
LATUR BHUKAMP
संपादक: अशोक चिंचोले

सांज दैनिक : शनिवार - ८ जुलै २०२३
वर्ष - ३७ वे
अंक - १०२
पाने - ४
E-Mail : dailybhukamp@gmail.com
RNI No. MAHMAR/2012/42770
☎ : -9422072823,251822
epaper.dainikbhukamp.com

किंमत २ रूपये




# ना टायर्ड हूँ, ना रिटायर्ड- शरद पवार

नाशिक : ना टायर्ड हूँ, ना रिटायर्ड हूँ अशा शब्दात राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते शरद पवार यांनी राष्ट्रवादीच्या दुसऱ्या गटाचे नेते उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या टिकेला उत्तर दिले. नाशिक येथे आयोजीत पत्रकार परिषदेमध्ये पत्रकाराने अजितदादा तुम्हाला रिटायर्ड व्हायला सांगतात या प्रश्नावर शरद पवार उत्तर देत होते.

वय होतं यात काही वाद नाही. पण तुम्ही प्रकृती चांगली ठेवली तर वय साथ देतं. त्यामुळे तो काही प्रश्र्न नाही. मोरारजी देसाई हे पंतप्रधान होते तेव्हा त्यांचं वय ८४ होतं. ते ज्या जोमाने काम करायचे तो अनुभव थक्क करणारा होता असंही शरद पवार यांनी म्हटलं आहे.

मी आज रस्त्याने येत असताना लोकांचे चेहरे, त्यांचे हावभाव मी पाहिले. सामान्य लोकांच्या चेहऱ्यांमधून जो आत्मविश्र्वास होता त्यामुळे मला आनंद आहे. छगन भुजबळ यांचा मुंबईत पराभव झाल्यानंतर आमची इच्छा होती की त्यांनी विधानसभेत आवश्यकता आहे. त्यानंतर येवल्यातून त्यांनी निवडणूक लढवली. १९८६ मध्ये मी कॉंग्रेसमधून बाहेर पडलो वेगळा पक्ष निवडला होता तेव्हा नाशिक जिल्ह्याने आम्हाला विजयी केलं होतं. जनार्दन पाटील हे येवल्यातून दोनदा निवडून आले होते. मारोतराव पवारही निवडूनही आले होते. त्यामुळेच आम्ही भुजबळांना सेफ जागा दिली होती. त्यावेळी तशी चर्चा झाली आणि तो निर्णय घेतला होता असंही आज शरद पवार यांनी सांगितलं.

माझी भूमिका मांडण्याची सुरुवात करण्यासाठी आज मी बाहेर पडलो आहे असं शरद पवार यांनी स्पष्ट केलं. मी इथे येत असताना आम्हाला सगळ्यांना म्हणजे मी, जितेंद्र आव्हाड, अमोल कोल्हे, सुप्रिया आम्हा सगळ्यांचं लोकांनी स्वागत केलं. आनंद एका गोष्टीचा आहे की वरुणराजाने स्वागत केलं. नाशिक जिल्ह्यात मी आत्ताच विचारत होतो की पावसाची स्थिती काय आहे? मला हे सांगण्यात आलं की रिमझिम आहे. पण पुरेसा पाऊस झालेला नाही असंही शरद पवार यांनी म्हटलं आहे.

मी नाशिक निवडलं? कारण स्वातंत्र्याच्या इतिहासात नाशिकचं वेगळं महत्व आहे. तसंच कॉंग्रेसच्या इतिहासातही नाशिकचं वेगळं महत्त्व आहे. अनेक उत्तम मार्गदर्शक या शहराने दिले आहेत. तसंच आणखी एक गोष्ट अशी आहे की आम्ही सगळे जण जी पिढी राजकारणात पडली त्यांचा आदर्श यशवंतराव चव्हाण होते. त्यावेळी चीनचं संकट देशावर आलं आणि त्यांना नेहरूंनी दिल्लीत बोलवलं. त्यांना संरक्षण मंत्री केलं. चव्हाण यांचा पहिला लोकसभेतला प्रवेश नाशिकमधून झाला. ही नाशिकची पार्श्र्वभूमी आहे त्यामुळे मी इथून सुरुवात केली आहे असंही शरद पवार यांनी म्हटलं आहे.

नाशिकमध्ये शक्तीप्रदर्शन

राष्ट्रवादी कॉंग्रेस फुटीनंतर शरद पवार यांनी पहिली जाहीर सभा छगन भुजबळ यांचा मतदार संघात असलेल्या येवला शहरात घेण्याचे जाहीर केले. येवल्यामध्ये जाहीर सभा घेण्यासाठी त्यांचे आज नाशिक शहरात आगमन झाले. नाशिक शहरात शरद पवार



यांच्या स्वागतासाठी कार्यकर्त्यांनी प्रचंड गर्दी केली होती. ठिकठिकाणी त्यांच्या अंगावर पुष्पवृष्टी करण्यात येत होती. नाशिक ते येवला यादरमयान कार्यकर्त्यांनी गर्दी केली होती. यावेळी ढोल, ताशे वाजविण्यात येत होते. नाशिक दौऱ्यात शरद पवार यांच्या समवेत जितेंद्र आव्हाड, खा. डॉ. अमोल कोल्हे होते. या दौऱ्याच्या निमित्ताने नाशिक, येवला येथे प्रचंड बंदोबस्त ठेवण्यात आला होता. पोलिसांशिवाय शिघ्र कृतीदल व एसआरपीच्या तुकड्याही बंदोबस्तासाठी तैनात होत्या.

# कारखान्याची २.२२ कोटीची फसवणूक

## शिफारस कर्त्यासह ५१ जणांवर गुन्हा

लातूर : शिवाजीराव पाटील निलंगेकर सहकारी साखर कारखाना लीज ओंकार साखर कारखाना प्रा. लि. युनीट-२ अंबुलगा, ता. निलंगा या कारखान्यास ऊसतोड मजूर व वाहन उपलब्ध करून देतो म्हणून अनामत उचलून मजूर व वाहनाचा पुरवठा न करता २ कोटी २२ लाख ३२ हजार ५७७ रूपयांची फसवणूक केली म्हणून शिफारसकर्त्यासह ५१ जणांवर निलंगा पोलिसांत फसवणूक व अफरातफरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अंबुलगा येथील शिवाजीराव पाटील निलंगेकर सहकारी साखर कारखाना लीज ओंकार सहकारी साखर कारखाना प्रा. लि.युनीट-२ च्या हंगाम २०२२-२३ साठी ऊसतोड मजूर व वाहन उपलब्ध करून देण्याबाबत करार केला. करार कर्त्यांना आरटीजीएस व चेकद्वारे २ कोटी २२ लाख ३२ हजार ५७७ रूपये देण्यात आले. मात्र, संबंधीत ठेकेदार, मजूर, शिफारसकर्ते यांनी वाहन व मजूर पुरवठा न करता कारखान्याची वरीलप्रमाणे फसवणूक केल्या प्रकरणी कारखान्याचे व्यवस्थापक सागर दिनकर मार्तंडे यांच्या फिर्यादीवरून निलंगा पोलिसांत ५१ जणांच्या विरूद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यामध्ये संबंधीत ठेकेदार व मजूर यांना ठेका द्यावा अशी शिफारस करणारे रावसाहेब संदीपान देशमुख रा. वकीलवाडी, ता. केज व बाळकिशन चौहान रा. वागदरातांडा, ता. गंगाखेड यांच्यासह ५१ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लातूर, बीड, परभणी आदी जिल्ह्यातील हे मजूर अथवा पुरवठादार आहेत. या प्रकरणी निलंगा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शेजाळ हे अधिक तपास करीत आहेत.

# कच्चा माल पुरवठा न करता प्रिंटींग प्रेस कंपनीची फसवणूक

उदगीर : उदगीर येथील एस. टी. कॉलनी भागात प्रिंटींगचा व्यवसाय करणारे भाऊसाहेब बिरादार यांना कंपनीने लागणाऱ्या कच्च्या मालापोटी आरटीजीएस द्वारे ३ लाख ७६ हजार रूपये पाठवून देखील मालाचा पुरवठा केला नाही म्हणून उदगीर शहर पोलिसांत जयपूर येथील एका फर्म चालकाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भाऊसाहेब बिरादार यांचे तिवटग्याळ उदगीर येथे उदय मुद्रा प्रिंटींग क्लस्टर फाऊंडेशन नावाची कंपनी आहे. या कंपनीस लागणारा कच्चा माल पीपी ओव्हन फॅब्रीक रोल पुरवीत असल्याचे भासवून सुमीत शर्मा रा. श्री श्याम इंटरप्राईजेस जयपूर राजस्थान याने आरटीजीएस द्वारे ३ लाख ७६ हजार रूपये घेवून कच्चा माल न पुरविता फसवणूक केली म्हणून उदगीर शहर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# केसीआर सरकार, भ्रष्ट सरकार

वारिंगल : तेलंगणा राज्यातील केसीआर सरकार म्हणजे सर्वात भ्रष्ट सरकार अशा शब्दात देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केसीआर सरकारवर हल्ला केला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज तेलंगणातील वारंगल येथे ६ हजार कोटी रूपयांच्या विकासकामांचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमात बोलत असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तेलंगणाचे मुख्यमंत्री केसीआर यांना टार्गेट केले होते. केसीआर हे स्वतःला तेलंगणाचे



मालक सिद्ध करण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांनी कोणत्याही स्वरूपाची कामे केली नाहीत. त्यांनी नरेंद्र मोदींना शिव्या घालणे, स्वतःच्या कुटुंबाला राज्याचा मालक समजणे, तेलंगणाच्या विकासाला खिंडार पाडणे, राज्याला भ्रष्टाचारात बुडविणे एवढीच कामे केली आहेत, अशा शब्दात टिका केली. तेलंगणा राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली जात आहे.

यामुळे या राज्याला अनेक संधी उपलब्ध होतील. या संधीच्या प्रत्येक क्षणाचा पुरेपूर वापर करून घेतला पाहिजे, असेही त्यांनी सांगितले. आमचे सरकार पुर्वीपेक्षा अधिक वेगाने काम करत आहे. देशात महामार्ग, द्रुतगती मार्ग, इकॉनॉमीक कॉरीडॉर, इंडस्ट्रीयल कॉरीडॉरचे जाळे निर्माण केल्याचे त्यांनी सांगितले.

# कमी किंमतीत म्हाडाची घरे देतो म्हणून तिघांची फसवणूक

लातूर : कमी किंमतीमध्ये म्हाडाची घरे देतो म्हणून गंगाखेड तालुक्यातील एका व्यक्तीने लातूर येथील तिघा जणांची पैसे घेवून फसवणूक केल्या प्रकरणी शिवाजीनगर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नवनाथ महादेव सावंत रा. कोद्री, ता. गंगाखेड, जि. परभणी याने बालाजी तुळशीराम कांबळे रा. कॉईलनगर लातूर यास व त्याच्या दोघा सहकाऱ्यास लातूरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे फोन करून बोलावून घेतले. या तिघांकडून त्याने कमी किंमतीत म्हाडाची घरे देतो म्हणून प्रत्येकी ४० हजार रूपये घेतले. विलास विठ्ठल बनसोडे रा. रमाई नगर, श्रीकांत उत्तम रणदिवे रा. गौतमनगर लातूर व बालाजी तुळशीराम कांबळे रा. कॉईलनगर लातूर यांच्याकडून प्रत्येकी ४० हजार रूपये याप्रमाणे १ लाख २० हजार रूपये घेवून फसवणूक केल्या प्रकरणी नवनाथ महादेव सावंत याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# व्यवस्थापकाने केला कंपनीच्या साहित्य व रोख रकमेचा अपहार

लातूर : पुणे येथील एका कंपनीच्या लातूर येथील शाखेमधील विविध साहित्य व रोख रक्कम असा एकूण ७ लाख रूपयांचा अपहार केल्या प्रकरणी लातूर शाखेच्या व्यवस्थापकाविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लातूर येथे एका कंपनीचे इलेक्ट्रीक साहित्याचे दुकान आहे. लातूरच्या शाखेत व्यवस्थापक म्हणून असलेला प्रसाद सुनील कुलकर्णी रा. कालिकादेवी मंदिराजवळ लातूर याने कंपनीचे वेगवेगळे साहित्य किंमत ५ लाख ३६ हजार ३८७ व रोख रक्कम १ लाख ६४ हजार ४१० असे एकूण ७ लाख ७९७ रूपयांचा अपहार केला आहे. या प्रकरणी या कंपनीचे प्रतिनिधी म्हणून पुणे शाखेत कार्यरत असलेले जयेशकुमार नायक यांच्या फिर्यादीवरून पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# हवामान विभागाचा ऑरेंज आणि यलो अलर्ट जारी

मुंबई : गेल्या काही दिवसात राज्यातील अनेक भागात पावसाने जोर धरलेला आहे. राज्यातील राजकीय वातावरण जरी तापलेले असले तरी होणाऱ्या पावसामुळे अनेक ठिकाणी गारवा पसरलेला आहे. परंतु अद्यापही राज्यातील काही जिल्हे असे आहेत, ज्या ठिकाणी पावसाचा एक थेंबही पडलेला नाही. ज्यामुळे त्या ठिकाणचा शेतकरी हा चिंतेत सापडलेला आहे. पण असे असताना आता हवामान विभागाकडून पुन्हा एकदा राज्यातील काही जिल्ह्यांना येलो आणि ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आलेला आहे. यामध्ये मुंबईसह उपनगरात आणि ठाणे, नवी मुंबई परिसरात जोरदार पाऊस कोसळण्याची शक्यता हवामान विभागाकडून व्यक्त करण्यात आलेली आहे. त्यामुळे हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार नागरिकांनी सावधानता बाळगण्याचे आवाहनही त्यांच्याकडून करण्यात आलेले आहे.

हवामान विभागाने व्यक्त केलेल्या अंदाजानुसार राज्यात आज (ता. ०८ जुलै) काही ठिकाणी मुसळधार पाऊस होण्याची शक्यता आहे. त्यासह हवामान विभागाने कोकणासह पश्र्चिम महाराष्ट्रात पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. कोकणामध्ये रायगड, रत्नागिरी जिल्ह्यात ऑरेंज अलर्ट तर सिंधुदुर्गमध्ये पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आलेला आहे. पालघर जिल्ह्यात देखील पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला असून पश्र्चिम महाराष्ट्रातील पुणे आणि कोल्हापूर जिल्ह्यासाठी पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आलेला आहे.



## त्यांच्या मते....

▣ सद्याच्या राजकारणाचा कंटाळा आल्याने मी दोन महिने राजकारणापासून सुट्टी घेत आहे.
-पंकजाताई मुंडे

☛ काहीतरी 'मोठ्ठा' निर्णय घ्यायचा झाल्यास एवढा वेळ तर लागणारच.

▣ आम्हीच राष्ट्रवादी आहोत अशी भूमिका निवडणूक आयोगासमोर आम्ही मांडली आहे.
-सुनिल तटकरे

☛ उद्या अजित पवार हेच शरद पवार आहेत अशी भूमिका आयोगासमोर मांडू नये म्हणजे झाले!

▣ सध्या महाराष्ट्राच्या राजकारणाचा चिखल झालाय.
- संजय राऊत

☛ म्हणून तर 'कमळा'ला ही भूमि पोषक बनते आहे.

▣ मी ऐकलं आहे कि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना राजीनामा देण्यास सांगितलय.
- आदित्य ठाकरे

☛ वर्षापूर्वी एकनाथ शिंदे सूरतला जात आहेत हे कसे काय कोणी सांगितलं नाही.

# अपात्रतेसंदर्भात ५४ आमदारांना विधीमंडळाची नोटीस

मुंबई : राज्य विधीमंडळाच्या वतीने राज्यातील शिवसेना शिंदे गटाचे ४० व ठाकरे गटाच्या १४ आमदारांना अपात्रतेसंदर्भात म्हणणे मांडण्यासाठी नोटीस बजावली आहे. ७ दिवसाच्या आत या आमदारांना आपले म्हणणे मांडावे लागणार आहे.

अपात्रतेविरोधातील कारवाई टाळण्यासाठी आमदारांना सर्व पुरावे सादर करावे लागणार आहेत. निवडणूक आयोगाकडून विधीमंडळाला शिवसेनेच्या घटनेची प्रत प्राप्त झाली आहे. शिवसेनेच्या घटनेचा अभ्यास करुन विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर लवकरच निर्णय घेण्याची शक्यता आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह १६ आमदारांना अपात्र ठरवण्यात यावं यासाठीची ठाकरे गटाची याचिका विधानसभा अध्यक्षांकडे दाखल आहे. त्यासाठी ठाकरे गटाकडून अनेकदा स्मरण पत्रही देण्यात आलेलं आहे. सर्वोच्च न्यायालयाने आमदारांच्या




अपात्रतेबाबत विधानसभा अध्यक्षांनी निर्णय घ्यावा, असे निर्देश दिले आहेत. यामुळे आता नोटीस देऊन राहुल नार्वेकर हे एकनाथ शिंदेंसह इतर आमदारांबाबत कार्यवाहीची सुरुवात करणार आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर ९० दिवसांच्या विधानसभा अध्यक्षांना निर्णय घेण्यासाठी मुदत देण्यात आली आहे.

महाराष्ट्रात राजकीय उलथापालथ सुरु असतानाच विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचं महत्त्वाचं वक्तव्य समोर आलं होत. केंद्रीय निवडणूक आयोगाकडून शिवसेनेच्या घटनेची प्रत आपल्याला मिळाली असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह १६ शिवसेना आमदारांविरुद्धच्या अपात्रतेच्या याचिकांवर लवकरच सुनावणी सुरु होणार आहे, असं राहुल नार्वेकर यांनी शुक्रवारी (७ जुलै) सांगितलं होतं. राहुल नार्वेकर यांनी निवडणूक आयोगाकडे शिवसेनेच्या घटनेची प्रत मागितली होती. ही प्रत त्यांच्या कार्यालयाला मागील आठवड्यात मिळाली आहे. आता आम्ही सुनावणी सुरु करु, असं राहुल नार्वेकर यांनी म्हटलं आहे. ही प्रक्रिया प्रत्यक्षात कधी सुरु होणार असं विचारलं असता नार्वेकर यांनी 'लवकरच' असं उत्तर दिलं होतं.

ठाकरे गटाने या आठवड्याच्या सुरुवातीला सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करुन आमदारांच्या अपात्रतेच्या याचिकांवर जलद सुनावणी करण्यासाठी अध्यक्षांना निर्देश द्यावेत, अशी मागणी केली आहे. सर्वोच्च न्यायालयाने ११ मे रोजीच्या निकालात विधानसभा अध्यक्षांना याचिकांवर मुदतीत निर्णय घेण्याचे निर्देश दिले असतानाही राहुल नार्वेकर हे जाणूनबुजून सुनावणीला उशीर करत असल्याचा दावा केला, याचिकेत करण्यात आला होता.

# उदगीर ग्रामीण पोलिसांनी पकडला ऐवजासह ५२ लाखाची बनावट दारू

उदगीर : कर्नाटकातून महाराष्ट्रात एका ट्रकमधून बनावट देशी दारू येत असल्याची खबर लागताच उदगीर ग्रामीण पोलिसांनी कॅप्टन चौकात सापळा लावून आज पहाटे ३० लाख ४५ हजार रूपयांची बनावट देशी दारू बॉक्स लिंबोळी पेंडीचे पोते व ट्रक यासह ५२ लाख ९५ हजार रूपयांचा ऐवज जप्त करून दोघांना ताब्यात घेतले आहे.

उदगीर ग्रामीण पोलिसांना कर्नाटकातून महाराष्ट्रामध्ये बनावट देशी दारू एका ट्रकमधून येत असल्याची माहिती मिळाली. तात्काळ पोलिसांनी कॅप्टन चौकात सापळा लावून आज पहाटे एक ट्रक हटकला. त्या ट्रकमध्ये बनावट देशी दारूचे सुमारे ८७० बॉक्स होते. या ट्रकमध्ये दारू आहे हे लक्षात येऊ नये म्हणून त्या ट्रकच्या वरच्या व मागच्या बाजूला लिंबोळी पेंडीचे पोते ठेवण्यात आले होते. पोलिसांनी सदर ट्रक पोलीस ठाणे प्रांगणात आणून अधिक चौकशी करता वरील प्रमाणे बनावट देशी दारू, लिंबोळी पेंडीचे पोते (किंमत दीड लाख) व ट्रक (किंमत २१ लाख) असा एकूण ५२ हजार ९५ हजार रूपयांचा ऐवज जप्त केला. या सोबत दोघा जणांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्याची प्राथमीक चौकशी करता त्याने हि दारू हुबळी येथून आणण्यात येत होती, असे सांगितले. मात्र, दारूच्या बॉटल असलेल्या बॉक्सवर प्रवरानगर रॉकेट असा मजकूर दिसत असल्याचे सांगण्यात आले. पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अजय देवरे, पोलीस उपअधीक्षक भागवत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्रीमंगले, बनसोडे, नागरगोजे, नारागुडे आदींनी ही कामगिरी केल्याची माहिती उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अरविंद पवार यांनी दिली.




# टोमॅटोचा भाव १४० रुपये किलो; या कारणामुळे लोकांना मोठी किंमत मोजावी लागतीय...



टोमॅटोच्या दरात सातत्याने वाढ होत आहे. दिल्ली-एनसीआरमध्ये टोमॅटोचा भाव १४० रुपये किलोच्या पुढे गेला आहे. दुसरीकडे, तामिळनाडूतील कोईम्बतूरमध्ये सोमवारी टोमॅटो १३० रुपये किलोने विकले गेले. टोमॅटोची आवक कमी झाल्यामुळे भाव वाढल्याचे कारण येथील व्यापाऱ्यांनी सांगितले.

दुसरीकडे, कृषी-पणन आणि व्यापार विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, शेतकऱ्यांनी तीन महिन्यांपूर्वी पीक नष्ट केले, कारण त्यांना अत्यंत कमी भाव मिळाला आणि त्यामुळे आता पुरवठ्यावर परिणाम झाला आहे.

इंडियन एक्स्प्रेसच्या अहवालानुसार, कमिशन एजंट, पी मॉरिसन यांनी सांगितले की, कर्नाटक, कृष्णगिरी आणि स्थानिक शेतातून आणि बाहेरून कमी आवक झाल्यामुळे सोमवारी एमजीआर मार्केटमधील लिलावात टोमॅटोची किंमत २,४५० रुपये (२५ किलो) पर्यंत पोहोचली. उदुमलाई. गेला.

दुसरीकडे, सामान्य दिवशी बाजारात २३०० टनांपर्यंत टोमॅटोची आवक होते, मात्र आता ही आवक ३००-४०० टनांवर आली आहे. किमतीनुसार, घाऊक विक्रेत्यांद्वारे ९५-१०० रुपये देऊ केले गेले.

कोईम्बतूरमधील मठमपट्टी येथील शेतकरी एम वडिवेल म्हणाले, सोमवारपर्यंत, गुणवत्तेनुसार प्रथम श्रेणी (मोठा) १,६५० रुपये प्रति टिप्पर (१४ किलो), द्वितीय श्रेणी (मध्यम) १,३०० रुपये आणि तृतीय श्रेणी (लहान) पूलुवापट्टी मार्केटमध्ये १,००० रुपये किंमतीला ऑफर करण्यात आली होती. कालांतराने भाव वाढत असले तरी हवामानामुळे उत्पादन खूपच कमी आहे. मार्चमध्ये, मी एक एकर पीक नष्ट केले कारण किंमत ४० रुपये प्रति क्रेट होती.

पी कंधासामी, शेतकरी संघटनेचे सरचिटणीस (गैर-राजकीय) म्हणाले, एक एकर टोमॅटो पिकवण्यासाठी सुमारे ८५,००० रुपये खर्च येतो. त्याचवेळी बाजारात टोमॅटोचा अतिरिक्त पुरवठा असल्याने शेतकऱ्यांना बाजारात तीन रुपये किलोचा भाव मिळत नव्हता. पर्याय नसल्याने अनेक शेतकऱ्यांनी आपला माल बाजारात नेला नाही आणि पिकांची नासाडी केली.

कृषी पणन आणि व्यापार विभागाचे उपसंचालक के पेरुमलसामी म्हणाले, सोमवारी उझावर संधाई येथे टोमॅटो ९५ ते १०० रुपये किलोने विकले गेले. शीतगृहाची सोय असूनही, आम्ही जास्तीत जास्त दोन दिवस उत्पादन ठेवू शकत नाही.

# काळ्या टोमॅटोच्या शेतीतून मिळवा लाखोंचे उत्पन्न! जाणून घ्या लागवड, खर्च आणि उत्पन्न

सध्या लाल टोमॅटोनंतर आता काळ्या टोमॅटोचीही बाजारात विक्री होत आहे. हे केवळ रंगीतच नाही तर औषधी गुणधर्मांनी देखील परिपूर्ण आहे. बाजारात त्याची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. अशा परिस्थितीत त्याच्या लागवडीतून बंपर मिळू शकतात. सध्या टोमॅटोचे भाव गगनाला भिडले आहेत. टोमॅटो खाणे ही सर्वसामान्यांच्या जिव्हाळ्याची बाब नाही.

अशा स्थितीत काळ्या टोमॅटोची चर्चा सुरू झाली आहे. सध्या भारतात गेल्या २ वर्षांपासून त्याची लागवड केली जात आहे. पूर्वी तो ब्रिटनमधून यायचा आणि इथे विकला जायचा पण आता बाजारात उपलब्ध आहे. या टोमॅटोची आता भारतातही लागवड केली जात आहे. त्याचे बियाणे ऑनलाइन खरेदी करून खरेदी करता येते.

बियाण्याच्या एका पॅकेटची किंमत ४५० रुपये आहे. एका पॅकेटमध्ये सुमारे १३० बिया असतात. काळ्या टोमॅटोची लागवड लाल टोमॅटोसारखीच आहे. हा टोमॅटो लाल टोमॅटोप्रमाणेच पिकवला जातो. वाढताना ते प्रथम हिरवे नंतर लाल होते. लाल झाल्यावर ते निळे झाल्यावर काळे होते. यामध्ये पोषक तत्वे मुबलक प्रमाणात आढळतात.

साखरेच्या रुग्णांसाठी हा रामबाण उपाय ठरू शकतो. काळ्या टोमॅटोमध्ये मुक्त रॅडिकल्सशी लढण्याची क्षमता असते. या कारणास्तव, ते कर्करोगाशी लढण्यास सक्षम आहे. काळ्या टोमॅटोमध्ये भरपूर प्रमाणात अँटी-ऑक्सिडेंट असतात. यामध्ये प्रोटीन, व्हिटॅमिन ए, सी, मिनरल्स आढळतात, ज्यामुळे तुमचा रक्तदाब नियंत्रणात राहतो.



व्हिटॅमिन ए आणि व्हिटॅमिन सी असल्यामुळे ते डोळ्यांसाठी फायदेशीर आहे. काळे टोमॅटो खाल्ल्याने हृदयविकाराचा झटका येण्याची शक्यता कमी होते कारण त्यात अँथोसायनिन आढळते. काळ्या टोमॅटोमध्ये चांगले कोलेस्ट्रॉल जास्त असते. जर तुम्हीही तुमच्या लठ्ठपणाने हैराण असाल तर हे नक्की खा.

टोमॅटोच्या दरात सातत्याने वाढ होत आहे. दिल्ली-एनसीआरमध्ये टोमॅटोचा भाव १४० रुपये किलोच्या पुढे गेला आहे. दुसरीकडे, तामिळनाडूतील कोईम्बतूरमध्ये सोमवारी टोमॅटो १३० रुपये किलोने विकले गेले. यामुळे हे पीक फायदेशीर आहे.

इंडिगो रोझ रेड आणि पर्पल टोमॅटोच्या बिया ओलांडून नवीन बी तयार केले. ज्यामध्ये हायब्रीड टोमॅटोचा जन्म झाला. इंग्लंडप्रमाणेच भारताचे हवामानही काळ्या टोमॅटोसाठी चांगले आहे. लाल टोमॅटोप्रमाणे त्याची लागवडही केली जाते.

या जातीच्या टोमॅटोच्या लागवडीसाठी उष्ण हवामान क्षेत्र योग्य मानले जाते. थंड ठिकाणी झाडे वाढू शकत नाहीत. त्याच्या लागवडीसाठी पाण्याचा उत्तम निचरा होणे अत्यंत आवश्यक आहे. तर जमिनीचे पी.एच. मूल्य ६-७ च्या दरम्यान असावे.

ही झाडे लाल रंगाच्या टोमॅटोपेक्षा खूप उशीरा उत्पन्न देऊ लागतात. पेरणीसाठी योग्य वेळ जानेवारी महिना आहे. हिवाळ्यात जानेवारी महिन्यात पेरणी करावी. जेणेकरून मार्च-एप्रिलपर्यंत काळे टोमॅटो मिळू शकतील.

काळ्या टोमॅटोच्या लागवडीत फक्त सीड मनी लागते. काळ्या टोमॅटोच्या लागवडीचा संपूर्ण खर्च काढून हेक्टरी ४-५ लाखांचा नफा मिळू शकतो. काळ्या टोमॅटोच्या पॅकिंग आणि ब्रँडिंगद्वारे नफा आणखी वाढेल.

# शेळीच्या दुधापासून खवा, पनीर, चीज, आरोग्यासाठी आहे फायदेशीर

आपल्या देशात गाई आणि म्हशीच्या दुधाला मोठी मागणी आहे. यामुळे अनेक शेतकरी दुग्ध व्यवसायासाठी याची निवड करतात. असे असताना शेळीच्या दुधास येणारा विशिष्ट गंध हा काप्रिक, कापरायिड आम्लामुळे येतो. हा गंध काही प्रमाणात नियंत्रित करता येतो, आपल्या भागात नेहमीच तयार करण्यात येणारे दुग्ध पदार्थ जसे की, चक्का, श्रीखंड, लोणी, दही, ताक शेळीच्या दुधापासून तयार करता येऊ शकतात.

हे पदार्थ आरोग्यास हितकारक व पौष्टिक आहे. गाईच्या दुधापेक्षा शेळीच्या दुधाचे गुणधर्म भिन्न आहेत. स्निग्ध पदार्थांच्या कणाचा लहान आकार, उच्च तापमानावर कमी स्थिरता, त्यापासून घट्ट व खवलेदार ही तयार न होणे आणि



एक विशिष्ट प्रकारचा गंध शेळीच्या दुधास आहे. परंतु नविन प्रक्रिया तंत्रज्ञानामुळे शेळीच्या दुधापासून पनीर, चीज, इत्यादी पदार्थ तयार करता येतात.

खवा हा इतर पदार्थांसाठी कच्चा माल असल्यामुळे चांगली मागणी असते. पेढा, बर्फी, गुलाबजाम हे पदार्थ बनविण्यासाठी खव्याचा वापर करतात. दुधाला उष्णता देऊन सतत ढवळणीच्या साह्याने सतत ढवळत राहून बाष्पीभवनाच्या साह्याने त्यातील पाणी कमी करून तयार होणारा घट्ट पदार्थ म्हणजे खवा होय.

अन्न प्रतिबंधक कायद्यानुसार खव्यामध्ये स्निग्धतेचे प्रमाण कमीत कमी २० टक्के असावे. शेळीच्या दुधापासून बनवलेल्या खव्याला एक विशिष्ट प्रकारचा गंध येतो. तो घालविण्यासाठी किंवा त्याची तीव्रता कमी करण्याच्यादृष्टीने खवा बनविताना त्यामध्ये थोड्या प्रमाणात (खव्याच्या प्रमाणात ०.२%) जायफळ पूड मिसळावी.

शरीराच्या पोषणासाठी लागणारी प्रथिने, दुग्ध शर्करा, स्निग्ध पदार्थ, खनिजद्रव्ये, जीवनसत्वे दुधात आवश्यक तेवढ्या प्रमाणात असतात, त्यामुळे गरोदर स्त्री, वृद्ध, तरुण मुले तसेच आजारी माणसे यांचेसाठी दूध हे एक उत्तम अन्न आहे. शेळीच्या दुधापासून पनीर हा एक पौष्टिक पदार्थ सहजरीत्या बनविता येतो. बांदल चीज किंवा सुरती पनीर हा रेनेट आणि विरजण वापरून तयार केलेला मऊ चीझचा प्रकार आहे.

ताजे दूध, मलई आणि पावडर या घटकांच्यापासून आइस्क्रीम तयार केले जाते. हे तयार करण्याची प्रक्रिया आणि पद्धती ढोबळमानाने नियमित आइस्क्रीम सारखीच आहे. युरोपमध्ये शेळीच्या दुधापासून बनवलेल्या चीजच्या काही प्रकारास अतिशय मोठ्या प्रमाणावर मागणी आहे. ग्रीस आणि फ्रान्स या देशात मोठ्या प्रमाणावर शेळीच्या दुधापासून चीज निर्मिती होते.

पिझ्झा खाणाऱ्या लोकांच्याकडून मोझरेला चीझची मागणी वाढत आहे. मोझरेला चीज हा पिझ्झाचा अविभाज्य घटक आहे. शेळीच्या दुधापासून मोझरेला चीज हा एक उत्तम पर्याय आहे. शेळीचे दूध आणि म्हशीचे दूध ५० : ५० या प्रमाणात वापरून बनवलेले मोझरेला चीज आर्थिकदृष्टीने फायदेशीर ठरते. यामुळे शेतकऱ्यांना हा देखील एक चांगला पर्याय आहे.

# ब्रोकोलीची देशभरात आहे जोरदार मागणी

आरोग्य तज्ञ हृदय, कर्करोग आणि कोलेस्ट्रॉलच्या चांगल्या आरोग्यासाठी ब्रोकोली खाण्याची शिफारस करतात. ब्रोकोलीच्या आरोग्यदायी फायद्यांमुळे या भाजीला सध्या खूप मागणी आहे. शेतात ब्रोकोली पेरण्याचा सर्वोत्तम काळ हिवाळ्यात असतो. आपल्या देशात सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यापासून मार्चच्या सुरुवातीपर्यंत ब्रोकोलीची लागवड केली जाते.

ब्रोकोलीची रोपवाटिका तयार केल्यानंतर ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये रोपे लावली जातात. ब्रोकोलीची रोपे ४-५ आठवड्यांत प्रत्यारोपणासाठी तयार होतात. रोपे लावण्यापूर्वी शेतात भरपूर शेणखत किंवा गांडूळ खत टाकले जाते. ब्रोकोली तीन रंगांची असते. पांढरा, हिरवा आणि जांभळा. मात्र, हिरव्या ब्रोकोलीला सर्वाधिक मागणी आहे.

एक हेक्टरमध्ये ब्रोकोली पेरणीसाठी ४०० ते ५०० ग्रॅम बियाणे आवश्यक आहे. तुम्ही हे बियाणे कृषी संशोधन केंद्र, बियाणे स्टोअर किंवा ऑनलाइन खरेदी करू शकता. रोपांची लागवड ३० सेमी अंतरावर करावी आणि दोन ओळींमधील अंतर ४५ सें.मी. १० ते १२ दिवसात



सिंचन करावे लागते. ब्रोकोली हे आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानले जाते. ही एक हिरवी भाजी आहे, जी फुलकोबीसारखी दिसते. शरीरासाठी आवश्यक असलेले पोषक घटक यामध्ये मुबलक प्रमाणात आढळतात.

यामध्ये प्रथिने, झिंक, फायबर, व्हिटॅमिन-ए, व्हिटॅमिन-सी आणि इतर अनेक महत्त्वाचे पोषक घटक असतात. जे तुम्हाला अनेक आजारांपासून वाचवण्यास मदत करतात. अनेकजण कोशिंबीर म्हणून खातात, तर काहींना त्याची भाजी खायला आवडते. चला तर मग जाणून घेऊया, ब्रोकोली खाण्याचे कोणते फायदे आहेत.

यामध्ये पोटॅशियम, व्हिटॅमिन-सी आणि अँटी-ऑक्सिडंट गुणधर्म भरपूर प्रमाणात असतात. जे हृदयाशी संबंधित आजारांपासून बचाव करण्यास मदत करतात. जर तुम्हाला हृदय निरोगी ठेवायचे असेल तर तुम्ही या भाजीला आहाराचा भाग बनवू शकता. ब्रोकोलीमध्ये फॅट आणि कॅलरीज कमी असतात. यामध्ये फायबरही मुबलक प्रमाणात आढळते.

जर तुम्हाला वजन कमी करायचे असेल तर तुम्ही या भाजीचे सेवन करू शकता. यामुळे पोट जास्त काळ भरलेले राहते, ज्यामुळे तुम्ही जास्त खाणे टाळू शकता. ब्रोकोलीमध्ये व्हिटॅमिन-सी, व्हिटॅमिन-बी६, व्हिटॅमिन-ए आणि अनेक पोषक घटक आढळतात, जे केस मजबूत करण्यासाठी प्रभावी आहेत. हे तुमचे केस गळणे थांबवते. निरोगी केसांसाठी, तुम्ही आठवड्यातून ३-४ वेळा कच्च्या ब्रोकोलीचे सेवन करू शकता.

# शेणाशी संबंधित हे व्यवसाय करतील तुम्हाला श्रीमंत, शेतकरी बांधवांनो जाणून घ्या..

जगभरातील शेतकरी आता शेतीव्यतिरिक्त विविध प्रकारचे व्यवसाय करत आहेत. मात्र, हे सर्व व्यवसाय शेती आणि पशुपालनाशी संबंधित आहेत. आज आम्ही तुम्हाला शेणापासून बनवण्याच्या या बिझनेस आयडिया सांगणार आहोत ज्यामुळे तुम्ही काही वेळातच श्रीमंत होऊ शकता. सर्वात मोठी गोष्ट म्हणजे हे व्यवसाय सुरू करण्यासाठी तुम्हाला जास्त भांडवलाची गरज नाही.

**शेणापासून बनवलेली धुपबत्ती पहिल्या क्रमांकावर आहे**


गाईच्या शेणापासून बनवलेल्या अगरबत्ती सध्या बाजारात सामान्य अगरबत्ती आणि अगरबत्तीपेक्षा जास्त विकल्या जातात. वास्तविक, गाईचे शेण अतिशय पवित्र मानले जाते, ते हिंदू धर्म मानणारे लोक त्यांच्या पूजास्थानी देखील वापरतात. त्यामुळेच शेणापासून बनवलेल्या अगरबत्ती बाजारात वेगाने विकल्या जात आहेत. सर्वात मोठी गोष्ट म्हणजे हा व्यवसाय तुम्ही अगदी घरबसल्या सहज सुरू करू शकता.

**शेणापासून बनवलेले दिवे**

अगरबत्तीप्रमाणेच शेणापासून बनवलेले दिवेही यावेळी बाजारात विकले जात आहेत. सर्वात मोठी गोष्ट म्हणजे गोबराच्या दिव्यांची विक्री भारताबरोबरच परदेशातही ऑनलाइन माध्यमातून केली जात आहे. हा व्यवसाय तुम्ही तुमच्या घरी सहज सुरू करू शकता. यासाठी सर्वप्रथम शेण कोरडे करून त्याची पावडर बनवावी, नंतर त्यात डिंक टाकून दिव्याच्या आकारात तयार करा. दोन ते चार दिवस उन्हात वाळवून ठेवल्यानंतर बाजारात चांगल्या दरात सहज विकता येते.

**शेणाच्या भांड्यांचा व्यवसाय**

सध्या पावसाळा आहे, अशा परिस्थितीत फुलांच्या कुंड्यांना



खूप मागणी असते. लोक आता हिरवाईकडे धावत आहेत. या भांड्याची सर्वात खास गोष्ट म्हणजे त्यात झाडे झपाट्याने वाढतात आणि जेव्हा हे भांडे वितळू लागते तेव्हा त्याचा खत म्हणूनही वापर केला जातो. त्यामुळेच आता बाजारात त्याची मागणी वाढली आहे. अशी भांडी सध्या बाजारात ५० ते १०० रुपयांना विकली जात आहेत.

**गायीच्या लाकडाचा व्यवसाय**

शेण ही अशी वस्तू आहे जी अंत्यसंस्कारात वापरली जाते. वास्तविक, हिंदू धर्मात जेव्हा एखाद्या व्यक्तीचा मृत्यू होतो, तेव्हा त्याच्यावर अंत्यसंस्कार केले जातात, म्हणजेच त्याचा मृतदेह जाळला जातो. अशा परिस्थितीत या उपक्रमासाठी भरपूर लाकूड लागते यामुळे दरवर्षी लाखो झाडे तोडली जातात. पण हा उपक्रम गायीच्या लाकडापासून सुरू झाला तर पृथ्वीवरील लाखो झाडे दरवर्षी वाचतील. सर्वात मोठी गोष्ट बनवण्यासाठी तुम्ही ५०००० पर्यंत मशीन आणू शकता आणि त्यानंतर तुम्ही तुमचा व्यवसाय सुरू करू शकता.

# पपईची लागवड करून शेतकरी चांगले उत्पन्न मिळवू शकतात, त्याच्या लागवडीबद्दल सर्व काही जाणून घ्या

भारत, ब्राझील, इंडोनेशिया, नायजेरिया आणि मेक्सिको हे पपई उत्पादनात सर्वात मोठे उत्पादक देश आहेत. पपई हे लवकर पिकणारे पीक आहे.त्याचा फायदा म्हणजे एका लागवडीत दुप्पट फळे येतात. पपई फळ कच्चे आणि शिजवलेले दोन्ही वापरले जाते. भारतातील बहुतांश भागात याची लागवड केली जाते.

पपईमध्ये व्हिटॅमिन ए मुबलक प्रमाणात आढळते. अपचनाची समस्या असणाऱ्यांसाठी पपई रामबाण उपाय आहे. याचे सेवन केल्याने अपचनाची समस्या दूर होते. पपईला बाजारात नेहमीच मागणी असते, त्यामुळे प्रगत पद्धतीने लागवड केल्यास कमी खर्चात जास्त नफा मिळवता येतो.

आंध्र प्रदेश, तामिळनाडू, बिहार, आसाम, महाराष्ट्र, गुजरात, उत्तर प्रदेश, पंजाब, हरियाणा, दिल्ली, जम्मू आणि काश्मीर, उत्तरांचल आणि मिझोराममध्ये याची सर्वाधिक लागवड केली जाते.

उष्ण दमट हवामानात पपईची चांगली लागवड करता येते. हे जास्तीत जास्त ३८ डिग्री सेल्सिअस ते ४४ डिग्री सेल्सिअस तापमानात घेतले जाऊ शकते, किमान तापमान ५ डिग्री सेल्सिअसपेक्षा कमी नसावे. उष्णता आणि दंव यामुळे पपईचे खूप नुकसान होते. पपई हे अतिशय वेगाने वाढणारे झाड आहे.

या झाडाला सामान्य माती, थोडी उष्णता आणि चांगला सूर्यप्रकाश मिळाल्यास ते चांगले वाढते, परंतु त्याला जास्त पाणी किंवा जमिनीत अल्कली जास्त प्रमाणात आवडत नाही. दुसरीकडे, ६.५-७.५ कि मूल्य असलेली हलकी चिकणमाती किंवा चिकणमाती माती ज्यामध्ये पाण्याचा चांगला निचरा होतो ती पपई लागवडीसाठी सर्वात योग्य आहे.

५०x५०x५० सेमी आकाराच्या शेतात २*२ मीटर अंतरावर जे खड्डे खोदले आहेत ते १५ दिवस उघडे ठेवा जेणेकरून खड्ड्यांना सूर्यप्रकाश मिळेल आणि हानिकारक कीटक व जंतू इत्यादींचा नाश होईल. यानंतर झाडाची लागवड करावी.

लागवड केल्यानंतर खड्डा जमिनीपासून १०-१५ सेंटीमीटर उंच राहील अशा पद्धतीने ५० ग्रॅम एल्ड्रिन माती आणि शेणखत मिसळून भरावा. खड्डा भरल्यानंतर पाणी द्यावे, जेणेकरून माती चांगली स्थिर होईल.झाडे लावताना हे लक्षात ठेवावे की खड्डा झाकून ठेवावा जेणेकरून पाण्याचा देठाला स्पर्श होणार नाही.

पपईच्या चांगल्या उत्पादनासाठी सिंचनाची योग्य व्यवस्था अत्यंत महत्त्वाची आहे. उन्हाळ्यात ६-७ दिवसांत आणि हिवाळ्यात १०-१२ दिवसांत पाणी द्यावे. दीर्घकाळ पाऊस नसताना पावसाळ्यात सिंचनाची गरज असते. स्टेमच्या थेट संपर्कात पाणी येऊ नये. त्यासाठी देठाभोवती माती अर्पण करावी. राष्ट्रीय स्तरावर पपईची प्रति हेक्टर उत्पादकता ३१७ क्विंटल/हेक्टर आहे. निरोगी पपईचे झाड तुम्हाला एका हंगामात सुमारे ४० किलो फळे देते. जर तुम्ही दोन झाडांमध्ये सुमारे ६ फूट अंतर ठेवू शकता आणि त्यानुसार तुम्ही एका हेक्टरमध्ये सुमारे २२५० झाडे तयार करू शकता. त्यानुसार एका हंगामात एक हेक्टर पपई पिकातून ९०० क्विंटल पपईचे उत्पादन घेता येते.

# बांबूचे लाकूड का जाळत नाहीत? जाणून घ्या काय आहे सत्य...



बांबू न जाळण्यामागचे शास्त्रीय कारण म्हणजे त्यात शिसे आढळते. त्यात शिशासोबतच इतर अनेक प्रकारचे धातू आढळतात जे मानवी शरीरासाठी चांगले नाहीत. संपूर्ण जगात बांबू हे एकमेव लाकूड आहे जे कोणीही पटकन जाळत नाही. हिंदूंनी हे लाकूड जाळणे नेहमीच अशुभ मानले आहे. म्हणूनच हिंदू बांबूचे लाकूड स्वयंपाकासाठी वापरत नाहीत किंवा पूजेतही वापरत नाहीत.

एक प्रकारे बांबूचे लाकूड जाळण्यास हिंदू धर्मात सक्त मनाई आहे. मात्र, हा बांबू न जाळण्यामागे केवळ आध्यात्मिक भावना नसून त्यामागे काही वैज्ञानिक तर्कही आहेत. वास्तविक बांबू हे असे लाकूड आहे ज्याची बासरी भगवान श्रीकृष्ण नेहमी आपल्याजवळ ठेवतात. लग्नसमारंभ असतानाही मंडपात बांबूचा वापर केला जातो.

मृत्यूनंतर माणसाचा मृतदेहही बांबूच्या खांबावर ठेवून अंत्यसंस्कारासाठी नेला जातो. म्हणजेच बांबू माणसाच्या जन्मापासून त्याच्या मृत्यूपर्यंत त्याच्यासोबत राहतो. यामुळेच बांबूला आध्यात्मिकदृष्ट्या अत्यंत पवित्र मानले जाते आणि ते जाळण्यास मनाई आहे. यासोबतच प्राचीन काळी बांबूचा वापर घरे बांधण्यासाठी भांडी बनवण्यासाठी आणि इतर प्रकारच्या वस्तू बनवण्यासाठी केला जात होता.

त्यामुळे जाणकार लोक सुरुवातीपासून हे उत्तम झाड जाळण्यास नकार देत होते. बांबू न जाळण्यामागचे शास्त्रीय कारण म्हणजे त्यात शिसे आढळते. त्यात शिशासोबतच इतर अनेक प्रकारचे धातू आढळतात जे मानवी शरीरासाठी चांगले नाहीत. हेच कारण आहे की शास्त्रज्ञही हे लाकूड जाळण्यास नकार देतात.

वास्तविक, जेव्हा तुम्ही बांबू जाळता तेव्हा त्यातील घटक धुराच्या माध्यमातून तुमच्या शरीरात प्रवेश करतात आणि मग ते अनेक आजारांना कारणीभूत ठरतात. यातील घटकामुळे न्यूरो आणि यकृताशी संबंधित आजार फार लवकर होतात. यामुळेच तज्ज्ञ बांबू जाळण्यास नेहमीच नकार देतात.

**वाचकांना विनंती**

सांज दै. भूकंपच्या अंकात विविध विषयावर लेख असतात. या लेखातील मत, दावे याविषयी संपादक सहमत असतात असे नव्हे, दैनिकात प्रसिद्ध होणारे अग्रलेख संपादकाचे मत असते, याची जबाबदारी संपादकाची आहे. याची वाचकांनी नोंद घ्यावी.

- व्यवस्थापक, सांज दै. भूकंप, लातूर

लातूर
# भूकंप
http://epaper.dainikbhukamp.com
LATUR BHUKAMP
शनिवार ८ जुलै २०२३


## अनुसूचित जमातींच्या लाभार्थ्यांसाठी १८०० २६७ ०००७ या टोल फ्री क्रमांकाची सेवा

लातूर : बीड व लातूर जिल्ह्यातील अनुसूचित जमातींच्या आदिवासी लाभार्थ्यांना आधार कार्ड, रेशन कार्ड, बँक पासबुक, आयुष्यमान भारत कार्ड, मनरेगा नोंदणी विषयक माहितींची सेवा उपलब्ध करून देण्यासाठी १८०० २६७ ०००७ या टोल फ्री क्रमांकाची सेवा आयुक्तालय, आदिवासी विकास नाशिक यांच्या स्तरावरून सुरू करण्यात आली आहे. उपरोक्त जिल्ह्यांतील सर्व आदिवासी लाभार्थ्यांनी या टोल फ्री सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प औरंगाबाद च्या प्रकल्प अधिकारी देवकन्या बोकडे यांनी केले आहे.

## मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सवी वर्षा निमित्त विविध कार्यक्रमासाठी जिल्ह्याला ५० लाखाचा निधी

लातूर : मराठवाडा मुक्ती संग्रामास या वर्षी ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. संपूर्ण मराठवाड्यात हे वर्ष मराठवाडा मुक्ती संग्रामाचे अमृत महोत्सवी वर्ष म्हणून साजरे होत आहे. आज समान्य प्रशासन विभागाच्या दि. ७ जुलै, २०२३ रोजी शासनाने या अमृत महोत्सवासाठी प्रत्येक जिल्ह्याला ५० लाख एवढ्या निधीच्या वितरणाचा शासन निर्णय निर्गमित केला आहे. लातूर जिल्ह्यातही यासाठी बैठक घेऊन जिल्हा प्रशासनाने मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सवासाठी कोण कोणते कार्यक्रम करायचे आहेत.. याबाबतचा आराखडा शासनाला पाठविला होता. यामध्ये स्वातंत्र्य सैनिकांचा सत्कार, त्यांचे अनुभव कथन कार्यक्रम आयोजित करणे, तालुका स्तरापर्यंत मुक्ती संग्राम लढ्याची गाथा कळावी म्हणून कार्यक्रम, मराठवाडा मुक्ती संग्राम चित्ररथ तयार करून मंडळनिहाय रथयात्रा काढणे, मुक्ती संग्राम संदर्भात छायाचित्रे, पोस्टर्स, भितीचित्रे, वस्तू, पुस्तके यांचे प्रदर्शन भरविणे, मुक्तीसंग्रामासंदर्भात रांगोळी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा या कार्यक्रमाचे आयोजन करणे, डिजिटल बोर्ड लावणे, रक्तदान शिबीर, आरोग्य शिबीर, दिव्यांगासाठी कार्यशाळा, मराठवाडा मुक्ती संग्रामातील सर्व वारसा स्थळांना, हुतात्मा स्मारकांना विद्यार्थ्यांच्या भेटी, तिथे श्रमदान करणे, हुतात्मा स्मारक ते हुतात्मा राहत होते त्याठिकाणा पर्यंत गौरव रॅली यासह अनेक कार्यक्रमांचा यात समावेश आहे.

# रिझर्व्ह बँक, जिल्हा अग्रणी बँक लातूर आणि जिल्हा प्रशासन यांच्या समन्वयाने विद्यार्थ्यांसाठी वित्तीय साक्षरता परीक्षा संपन्न

लातूर : भारतीय रिझर्व्ह बँक, जिल्हा अग्रणी बँक लातूर आणि जिल्हा प्रशासन यांच्या समन्वयाने विद्यार्थ्यांसाठी सोमवार, दि. ३ जुलै २०२३ रोजी वित्तीय साक्षरता परीक्षा जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृह येथे घेण्यात आली.

आर्थिक समावेशनाचे उद्दिष्टे पुढे नेण्यासाठी रिझर्व बँक ऑफ इंडियाने जिल्ह्यातील दहा तालुक्यांमधील आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी जिल्हास्तरीय परीक्षा सोमवार , दि. ३ जुलै, २०२३ रोजी आयोजित केली होती. या वित्तीय साक्षरता परीक्षेत जिल्ह्यातील दहा शाळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

या परीक्षेत जिल्हा परिषद प्रशाला किनगावच्या विद्यार्थिनी कु. अपेक्षा बालाजी कांबळे व कु. अदिती अंबादास कांबळे यांनी प्रथम पारितोषिक पटकावित राज्यस्तरीय फेरीसाठी त्यांची निवड झाली आहे. तसेच जिल्हा परिषद प्रशाला हडोळतीचे विद्यार्थी कु. ऋतुजा महादेव हडोळतीकर व ओंकार लिंगुअप्पा मिरजगावे यांनी द्वितीय पारितोषिक पटकावले. शिवाय जिल्हा परिषद प्रशाला तांदूळजाचे विद्यार्थी कु. आकांक्षा नरसिंग गणगे व लक्ष्मण महादेव मुगळे यांनी तृतीय पारितोषिक पटकावले. या विद्यार्थ्यांना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी रिझर्व्ह बँक चे सहायक महाव्यवस्थापक सुभान बाशा, नाबार्डचे सहायक महाव्यवस्थापक प्रमोद पाटील, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक प्रमोद शिंदे आणि विविध शाळांचे शिक्षक उपस्थित होते.

## महाराष्ट्र महसुल न्यायाधिकरण औरंगाबाद
### जुने हाय कोर्ट जवळ स्नेहनगर औरंगाबाद
Email-mrtaurangabad@gmail.com Phone No. 02402336201

### जाहिर प्रगटन

औरंगाबाद येथील महाराष्ट्र महसुल न्यायाधिकरण, औरंगाबाद यांच्या न्यायालयात अर्ज क्र. ०९ / डी/२०२२ लातूर शिवाजी शहाजीराव सुर्यवंशी विरूद्ध इरप्पा ग्यानोबा आकनगीरे (मयत) यांनी वारस सुभाष इरप्पा आकनगीरे व इतर
प्रति,
१. सुभाष इरप्पा आकनगीरे रा. सिंदगाव, ता. रेणापूर, जि. लातूर सद्या रा. खुटेगांव, ता. जि. लातूर, २. रूक्साना महेबुब पठाण रा. लातूर, ता. जि. लातूर, ३. निळकंठ लक्ष्मण हात्तरगे, रा. कन्हेरी रिंग रोड, लातूर, ४. शेख मुक्तार जलाल मीस्त्री, रा. मीस्कीनपुरा, लातूर, ता. जि. लातूर, ५. अयुबखान हमीदखान पठाण रा. साळे गल्ली, लातूर, ता. जि. लातूर, ६. महादेव शहाजीराव मुळे, रा. औसा रोड, लातूर, ता. जि. लातूर, ७. शहाजीराव हरीभाऊ मुळे, रा. औसा रोड, लातूर, ता. जि. लातूर, ८. ललीतभाई देवसीभाई पटेल रा. विवेकानंद चौक, लातूर, ता. जि. लातूर, ९. मंगल रामेश्वर मुंदडा, रा. मुरूड, ता. जि. लातूर, १०. विनायकराव नरहरराव जाधव, रा. लातूर, ता. जि. लातूर, ११. संजय शिवशंकर चितकोटे, रा. लातूर, ता. जि. लातूर, १२. श्रीमती किरण चंद्रप्रकाश अग्रवाल, रा. लातूर, ता. जि. लातूर, १३. श्रीमती शमी अर्जुन कामदार, रा. लातूर, ता. जि. लातूर, १४. सुरेश रामभाऊ सोनवलकर, रा. लातूर, ता. जि. लातूर, १५. पंकज पांडुरंग भनसाळे, रा. मुरूड, ता. जि. लातूर, १६. गौरव पांडुरंग भनसाळे, रा. मुरूड, ता. जि. लातूर, १७. प्रकाश शिवदास पवार, रा. लातूर, ता. जि. लातूर, १८. पांडुरंग जगन्नाथ भनसाळे, रा. मुरूड, ता. जि. लातूर, १९. श्रीमती भाग्यश्री नानासाहेब काळे, रा. लातूर, ता. जि. लातूर, २०. संघमित्र भास्कर बानाटे, रा. लातूर, ता. जि. लातूर, २१. श्रीमती अनिता आत्माराम भोसले, रा. लातूर, ता. जि. लातूर, २२. श्रीमती अंजुशा सतिष देशपांडे, रा. लातूर, ता. जि. लातूर, २३. श्रीमती कल्पना वसंत जाधव, रा. धनेगाव, ता. जि. लातूर, २४. पंकज प्रभाकर परभणीकर, रा. लातूर, ता. जि. लातूर, २५. संजयसिंग ग्यानसिंग चांदीने, रा. लातूर, ता. जि. लातूर, २६. श्रीमती मीना राजपाल पाटील, रा. लातूर, ता. जि. लातूर, २७. श्रीमती प्रतीभा रामराव बिराजदार, रा. लातूर, ता. जि. लातूर, २८. श्रीमती सुरेखा सुरेश पालशेटे, रा. तळणी, ता. औसा, जि. लातूर, २९. विशाल विष्णु उतगे, रा. लातूर, ता. जि. लातूर, ३० नंदकिशोर गोपाल कुलकर्णी, रा. लातूर, ता. जि. लातूर. ३१. नरेंद्र श्रीनिवास कुलकर्णी रा. लातूर, ता. जि. लातूर, ३२. प्रशांत धोंडीबा कोंडेकर रा. शिराढोन, ता. कळंब, जि. लातूर, ३३. गोविंद गणेश देशपांडे, हिप्परसोगा, ता. औसा, जि. लातूर, ३४. श्रीमती सुजाता राजाभाऊ पाटील, रा. चिंचोली माळी, ता. केज, जि. बीड, ३५. मोहन गोपाल देशपांडे, रा. लातूर, ता. जि. लातूर, ३६. श्रीमती उमा चंद्रशेखर स्वामी, रा. लातूर, ता. जि. लातूर, ३७. श्रीमती कालींदा भास्कर पाटील, रा. लातूर, ता. जि. लातूर, ३८. श्रीमती सुमन सदाशिव वाकळे, रा. लातूर, ता. जि. लातूर, ३९. श्रीमती गितांजली सदाशिव माळी, रा. लातूर, ता. जि. लातूर, ४०. श्रीमती सुजाता धनंजय कोंडेकर, रा. लातूर, ता. जि. लातूर, ४१. गोपाळ तुकाराम शिंदे, रा. लातूर, ता. जि. लातूर, ४२. ज्ञानेश्वर रंगराव जावळे, रा. लातूर, ता. जि. लातूर, ४३. रघुनाथ पांडुरंग वारीळे, रा. सुगाव, ता. जि. लातूर, ४४. एकनाथ भानुदास वारीळे, रा. सुगाव, ता. जि. लातूर, ४५. श्रीमती मीना राजपाल पाटील, रा. बनसारोळा, ता. जि. लातूर, ४६. श्रीमती छाया दगडु जाधव, सिकंदरपूर, ता.जि. लातूर, ४७. युवराज बाळाजी कदम, रा. लातूर, ता. जि. लातूर, ४८. अमीर अशोक कुंबाज, रा. लातूर, ता. जि.लातूर, ४९. सुनिल अशोक कुंबाज, रा. लातूर, ता. जि. लातूर, ५०. स्वामी रागवेंद्र, रा. लातूर, ता. जि. लातूर, ५१. उपजिल्हाधिकारी (सामान्य) लातूर, जिल्हाधिकारी कार्यालय लातूर, जि. लातूर.

ज्या अर्थी, शिवाजी शहाजीराव सुर्यवंशी यांनी त्यांचे विधिज्ञ अ‍ॅड. एस. जी. रूद्रावर यांचे मार्फत मा. महाराष्ट्र महसुल न्यायाधिकरण औरंगाबाद, यांच्या न्यायालयात या न्यायाधिकरणाचे आदेश क्रमांक ०७/बी/२०२० एल दिनांक २३/०२/२०२२ या विरूद्ध अर्ज दाखल केलेला आहे. यामध्ये आपण प्रतिवादी आहे.

त्या अर्थी, या जाहिर प्रगटनाद्वारे तुम्हास कळविण्यात येते की, प्रकरण ०९/डी/२०२२ लातूर प्रकरण **सुनावणीसाठी दिनांक ०५/०९/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता महाराष्ट्र महसुल न्यायाधिकरण, जुने हायकोर्टाचे मागे, स्नेहनगर, औरंगाबाद येथे ठेवण्यात आले आहे.** तरी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून आपल्या वकिला मार्फत वा प्राधिकृत केलेल्या व्यक्तीमार्फत आक्षेप नोंदवावे व सुनावणीचे दिवशी आपले म्हणणे मांडावे अन्यथा सदरील प्रकरणी आपले कोणत्याही प्रकारचे आक्षेप किंवा उजर नाही असे गृहित धरून अर्जदाराचा अर्ज निकाली काढण्यात येईल.

करिता हे जाहिर प्रगटन दिनांक ०५/०७/२०२३ रोजी माझ्या सही निशी दिली.

स्वाक्षरीत/-
उप प्रबंधक
महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण
औरंगाबाद

# वीजपुरवठा आणि पाणीपुरवठा संदर्भात आ. अभिमन्यू पवार यांनी घेतली उपमुख्यमंत्र्यांची भेट

औसा : आमदार अभिमन्यू पवार यांनी औसा मतदारसंघातील दोन महत्त्वपूर्ण विषयांच्या संदर्भात (दि.८) रोजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत भूकंपग्रस्त गावांसाठी विशेष बाब म्हणून ३० खेडी पाणी पुरवठा योजनेचे वीजबिलावरील व्याज माफ करण्यात यावे व वीजपुरवठा सुरळीत करण्यात यावा तसेच महावितरण संदर्भात प्रस्तावित करण्यात आलेल्या कामांना मंजुरी देऊन कामे तातडीने हाती घेण्यात यावीत हि मागणी केली. या दोन्ही कामासंदर्भात उपमुख्यमंत्र्यांनी उचित कार्यवाही करण्याच्या सूचना व्यवस्थापकीय संचालक, महावितरण यांना दिल्या आहेत.

देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री असताना २८ कोटी रु निधीच्या मंजुरीसह किल्लारी व ३० खेडी पाणीपुरवठा योजना पुनर्जीवित केली होती. सदरील निधीतून थकीत वीजबिलाचा भरणा करण्यात आला असून थकीत वीजबिलावरील थकीत व्याजाचा भरणा न झाल्यामुळे वीजपुरवठा बंद असून योजना पुनर्जीवित होऊनही ३० भूकंपग्रस्त गावांमधील नागरिकांना त्याचा लाभ मिळत नाहीये. यासंदर्भात आमदार अभिमन्यू पवार यांनी (दि.८) जुलै रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन भूकंपग्रस्त गावांसाठी विशेष बाब म्हणून वीजबिलावरील व्याज माफ करण्यात यावे व वीजपुरवठा सुरळीत करण्यात यावा अशी आग्रही मागणी केली. उपमुख्यमंत्र्यांनी व्याजमाफीच्या प्रस्तावाला तात्काळ मान्यता देण्याच्या सूचना व्यवस्थापकीय संचालक, महावितरण यांना दिल्या आहेत.



आ. अभिमन्यू पवार यांच्या मागणीवरून मंजूर करण्यात आलेले औसा तालुक्यातील माळुंब्रा येथील ३३/११ केव्ही उपकेंद्र उभारण्यासाठी जागेची कार्यवाही पूर्ण झाली असून सदरील उपकेंद्राचे काम लवकरात लवकर सुरु करण्यात यावे तसेच सुधारित वितरण क्षेत्र योजना (आरडिएसएस) अंतर्गत औसा मतदारसंघातील हालसी हत्तरगा, आशिव, उजनी, याकतपूर या ठिकाणी ३३/११ केव्ही उपकेंद्र उभारणे, औसा उपकेंद्रातील ५ एमव्ही रोहित्रची क्षमता वाढवून १० एमव्ही करणे आणि औसा एमआयडीसी, नागरसोगा, जवळगा पो., खरोसा व तपसे चिंचोली या उपकेंद्रांना अतिरिक्त ५ एमव्ही चे रोहित्र उपलब्ध करून देणे इ. कामे प्रस्तावित करण्यात आली असून या कामांना मंजुरी देऊन कामे तातडीने हाती घेण्यात यावीत अशीही विनंती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना यावेळी आमदार अभिमन्यू पवार यांनी केली. यासंदर्भातही तात्काळ उचित कार्यवाही करण्याच्या सूचना त्यांनी व्यवस्थापकीय संचालक, महावितरण यांना दिल्या आहेत.

# गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार योजना दुहेरी लाभाची



लातूर : महाराष्ट्र राज्य हे देशात जास्त धरणे व जलसाठे असलेले राज्य असून या धरणांमध्ये दरवर्षी साठत चाललेल्या गाळामुळे धरणांच्या साठवण क्षमतेत मोठ्या प्रमाणात घट झालेली आहे. या धरणांमध्ये साचलेला गाळ उपसा करुन शेतात पसरविल्यास धरणांची मुळ साठवण क्षमता पुनर्स्थापित होण्याबरोबरच कृषि उत्पन्नात भरीव वाढ होणार आहे. ही बाब विचारात घेऊन राज्यातील धरणांमधील गाळ काढणे व तो शेतामध्ये वापरणे यासाठी राज्यातील धरणांमधील गाळ काढून तो शेतात पसरविण्यासाठी 'गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार' ही योजना राबविण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

यंदा अल निनोमुळे पाऊस सरासरीपेक्षा कमी पडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. संपूर्ण राज्यात आणि विशेषतः विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील अवर्षणप्रवण जिल्हे आणि महत्त्वाकांक्षी जिल्ह्यांमध्ये ही योजना राबविली जात आहे. या आधीच्या योजनेत शासनाकडून फक्त इंधन खर्च देण्यात येत होता. मशीन खर्च स्वयंसेवी संस्था तर गाळ पसरविण्यासाठीचा वाहतूक तसेच पसरविण्याचा खर्च शेतकरी स्वतः करीत होते. गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार या योजनेचे महत्व पाहता ती जोमाने राबविणे आवश्यक आहे. त्यामुळे यावेळेस शासनाकडून यंत्रसामुग्री आणि इंधन दोन्हीचा खर्च देण्यात येतो आहे.

या वर्षी लातूर जिल्ह्यात या वर्षी १७ मे, २०२३ ते १ जुलै, २०२३ पर्यंत लोकसहभागातून रेणापूर, उदगीर, अहमदपूर, लातूर, औसा व निलंगा तालुक्यातील रेणापूर मध्यम प्रकल्प, गुत्ती साठवण तलाव, गूडसूर साठवण तलाव, तिरु मध्यम प्रकल्प, सोनखेड साठवण तलाव, सलगरा पाझर तलाव, भादा पाझर तलाव, वांगजी पाझर तलाव, बिरवली पाझर तलाव, बिरवली पाझर तलाव, तांबाळा काळा तलाव तर गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवारांतर्गत औसा व निलंगा, उदगीर तालुक्यातील गोंद्री पाझर तलाव, खुंटेगाव साठवण तलाव, मसलगा मध्यम प्रकल्प व निम्न तेरणा प्रकल्प, एकुर्का लघु पाटबंधारे तलाव, कल्लूर लघु पाटबंधारे तलाव यातून गाळ काढला असून तो काढलेला गाळ एकूण ३ लाख ३ हजार २४३ घनमीटर एवढा असून यामुळे जवळपास ७५८ एकर क्षेत्रात गाळ पसरविण्यात आला आहे. यामुळे ३० कोटी ३२ लाख लिटर एवढ्या पाणीसाठ्यात वाढ होणार आहे. हा उपक्रम शेतीसाठी आणि पाणीसाठ्यासाठी अत्यंत उपयोगाचा ठरणार असल्यामुळे शेतकऱ्यांचा या योजनेला मोठा प्रतिसाद मिळाला.

## CHANGE OF NAME DECLARATION

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER : **SHAIKH MOINUDDIN TO : SHAIKH MOINODDIN** HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE **SHAIKH MOINODDIN** IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY WIFE/ CHILDREN AND RELATIVE.
**OLD NAME :- SHAIKH MOINUDDIN**
**NEW NAME :- SHAIKH MOINODDIN**
**ADDRESS : PANCHKKI GALLI, UDGIR, DIST. LATUR (M. S.)**

श्री.तिरूपती
ट्रेडींग कंपनी
शिवाजी चौक, निलंगा, जि. लातूर
जैन ठिबक सिंचन
जैन स्प्रिंकलर
जैन पी.व्ही.सी.पाईपचे
-: अधिकृत विक्रेते:-
प्रो. गुणवंत गायकवाड हलगरकर
फोन:-दु. २४२४६३, मो.९४०४६८२९९९

छोटी झेरॉक्स मशीन व प्रिंटर विक्री
कलर प्रिंट/झेरॉक्स
B/W प्रिंट/झेरॉक्स
जम्बो झेरॉक्स/प्रिंट
डिझाईनिंग/पासपोर्ट फोटो
रिफीलींग/टोनर/फोटो पेपर
लॅमिनेशन मशिन व मटेरिअल
झेरॉक्स मशीनचे अधिकृत विक्रेते :
बोरा झेरॉक्स
व्यापारी धर्मशाळा, महात्मा गांधी चौक, लातूर.
9673344777



SINCE 1972
माळवदकर एजन्सीज
सावेवाडी, लातूर
mo. 9422656522
सर्व प्रकारच्या फर्निचरचे उत्पादक व विक्रेते

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस कळविण्यात येते की, श्री. राहुल नागनाथ घुगे, आरोग्य सेवक (पुरूष), उपकेंद्र काटगांव अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र जवळा बु., ता. व जि. लातूर हे दिनांक २५/०७/२०१९ पासून त्यांचे कार्यक्षेत्रात व कर्तव्यावर अनाधिकृतपणे गैरहजर आहेत. कामावर हजर होण्यासाठी संबंधितास वारंवार कळवूनही ते आजतागायत कामावर रूजू झालेले नाहीत. अनाधिकृतपणे गैरहजर असल्याच्या कारणावरून संबंधिताविरूद्ध विभागीय/खातेनिहाय चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली आहे. सहाय्यक आयुक्त (चौकशी) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांनी सुनावणीसाठी पाठविलेली नोटीस ही भारतीय डाकद्वारे संबंधितास त्यांचे मूळ गावी पत्त्यावर पाठविली असून अद्याप ती संबंधितास तामील होत नाही.

तेंव्हा, या जाहीर प्रगटनाद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, श्री. राहूल नागनाथ घुगे, आरोग्य सेवक (पुरूष), उपकेंपद्र काटगांव अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र जवळा बु., ता. व जि. लातूर यांना, त्यांचेशी संबंधित नातेवाईक, मित्र परिवार यांचे मार्फत सदर जाहीर प्रगटन अवगत करण्यात यावे. सदरचे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून आठ (८) दिवसाचे आत श्री. राहूल नागनाथ घुगे, आरोग्य सेवक (पुरूष), उपकेंद्र काटगांव अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र जवळा बु., ता. व जि. लातूर हे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद लातूर यांचेकडे उपस्थित न झाल्यास संबंधितास सेवेची गरज नाही, असे समजून संबंधितास जिल्हा परिषद लातूर कडील सेवेतून कमी करण्याचा एकतर्फी निर्णय घेण्याचा अधिकार हा महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद लातूर (नियुक्ती प्राधिकारी) यांना राहील.

(मा. मु. का.अ. जि. प. लातूर यांचे मान्यतेवरून)

स्थळ - लातूर
दिनांक - ०८/०७/२०२३

जाहीर प्रगटन देणार,
(डॉ. हणमंत वडगावे)
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद लातूर